# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

सप्टेंबर - डिसेंबर २०१७ वर्ष १० अंक ३ पृष्ठ ८ रु. २/-


## तुम्ही संपूर्ण मानवजातीला जबाबदार आहात

**ज**बाबदारी - इंग्रजीमधील Responsibility - हा शब्द त्याच्या संपूर्ण अभिप्रेत अर्थासह समजला पाहिजे. तो to respond - प्रतिसाद देणे - ह्या शब्दापासून येतो. अर्धवटपणे प्रतिसाद देणे नव्हे तर संपूर्णपणे प्रतिसाद देणे. त्या शब्दात आणखी एक गर्भितार्थ आहे, तो म्हणजे मागच्या संदर्भाची कास धरणे, तुमच्या पार्श्वभूमीला प्रतिसाद देणे. म्हणजे परत तुमच्या संस्कारांचा घेतलेला आधार. सर्वसाधारण समजाप्रमाणे जबाबदारी ही माणसाच्या संस्कारबद्धतेची कृती आहे. ज्या संस्कृतीत किंवा समाजात माणूस जगत असतो, ते साहजिकच त्याच्या मनावर संस्कार करतात, मग ती संस्कृती एतद्देशीय असो की परदेशीय असो. त्या पार्श्वभूमीतून प्रतिसाद होतात आणि हे प्रतिसाद आपल्या जबाबदारीला मर्यादित करतात. जर कोणी भारतात, युरोपात, अमेरिकेत किंवा अन्य कोठे जन्माला आला असेल तर त्याचे प्रतिसाद त्याच्या धार्मिक अंधश्रध्दांप्रमाणे - सर्व धर्म अंधश्रद्धेच्या इमारती आहेत-किंवा राष्ट्रवादाप्रमाणे किंवा वैज्ञानिक सिद्धांताप्रमाणे असतील. ह्या गोष्टी माणसाच्या प्रतिक्रिया ठरवतात. आणि त्या नेहमी सीमित असतात, मर्यादित असतात. आणि म्हणून तिथे नेहमीच विसंगती, संघर्ष आणि गोंधळाचा प्रादुर्भाव असतो. हे अटळ आहे आणि ते माणसा- माणसामध्ये विभाजन घडवून आणते. कुठल्याही स्वरूपातील विभागणी ही केवळ संघर्ष व हिंसाच निर्माण करीत नाही तर त्याचा शेवट युद्धात होतो.

जर कोणी जबाबदार ह्या शब्दाचा खरा अर्थ आणि आज जगात काय घडते आहे हे प्रत्यक्ष समजू शकला तर त्याला दिसून येईल की जबाबदारी ही बेजबाबदार झाली आहे. बेजबाबदारी काय आहे हे समजून घेताना आपल्याला जबाबदारी काय आहे याचे आकलन होण्याची सुरूवात होईल. जबाबदारी ह्या शब्दाच्या मथितार्थाप्रमाणे ती संपूर्णासाठी आहे, स्वत:साठी नाही, कुटुंबासाठी नाही, एखाद्या कल्पनेसाठी किंवा श्रद्धांसाठी नाही, तर अखिल मानवजातीसाठी आहे.

आपल्या विविध संस्कृतींनी व्यक्तीत्ववाद समजल्या जाणाऱ्या विलगपणावर भर दिला आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे की, प्रत्येक जण आपल्या मनाला येईल ते करतो, किंवा समाजाला कितीही फायद्याचे किंवा उपयोगाचे असो किंवा नसो, तरीही तो स्वत:च्या छोट्याश्या विशिष्ट नैसर्गिक प्रतिभेला चिकटून राहतो. ह्याचा अर्थ असा नव्हे की जे एकाधिकारवाद्यांना हवे त्यावर विश्वास ठेवणे. राष्ट्र आणि राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे अधिकारी ह्यांना महत्त्व असते, माणसाला नाही, ह्यावर आपण विश्वास ठेवावा हे एकाधिकारवाद्यांना हवे असते. राष्ट्र ही कल्पना आहे. माणूस जरी त्या राष्ट्रात राहत असला तरी तो कल्पना नाही. भीती ही वास्तव आहे, कल्पना नाही.

मानसिक स्तरावर माणूस म्हणजे समग्र मानवता आहे. तो केवळ तिचे प्रतिनिधित्व करत नाही, तर तो म्हणजेच संपूर्ण मनुष्यजात आहे. मूलत: तो संपूर्ण मानवतेची मानसिकता आहे. ह्या सत्यावर वेगवेगळ्या संस्कृतींनी प्रत्येक माणूस वेगळा असल्याचा भ्रम लादला आहे. शेकडो वर्षे माणूस ह्या भ्रमात अडकला आहे आणि हा भ्रम वास्तव बनला आहे. जर तुम्ही तुमच्या संपूर्ण मानसिक घडणीचे बारीक निरीक्षण केलेत तर तुम्हाला आढळून येईल की जसे तुम्ही दु:ख भोगता तसेच वेगवेगळ्या प्रमाणात अखिल मानवजात दु:ख भोगते. तुम्ही एकटे पडला असाल तर सर्व मानव जातीला हा एकटेपणा माहीत असतो. वेदना, द्वेष, मत्सर, भीति सर्वांना माहीत आहे. म्हणून मानसिकदृष्ट्या, आतून तुम्ही दुसऱ्या माणसासारखे आहात. शारीरिक, जैविक वेगळेपणा असेल जसे उंच, ठेंगणा वगैरे-परंतु मूलत: तुम्ही साऱ्या मनुष्यजातीचे प्रतिनिधी आहात.

म्हणून मानसिकरीत्या तुम्ही म्हणजे जग आहात. तुम्ही संपूर्ण मानवजातीला जबाबदार आहात. एक वेगळा माणूस म्हणून स्वत:लाच जबाबदार नव्हे; तो एक मानसिक भ्रम आहे. संपूर्ण मानवजातीचा प्रतिनिधी म्हणून तुमचा प्रतिसाद संपूर्ण आहे, अंशत नाही. मग जबाबदारीला एक पूर्णपणे वेगळाच अर्थ प्राप्त होतो. तुम्हाला ह्या जबाबदारीची कला शिकली पाहिजे. जर कोणी मानसिकरीत्या आपण म्हणजे जग आहे ह्या सत्याचे मर्म आत्मसात करू शकले तर मग जबाबदारी जबरदस्त शक्तीशाली प्रेम बनू शकते. मग आपण मुलाची फक्त कोवळ्या वयातच काळजी वाहणार नाही तर त्याला आयुष्यभर जबाबदारीचा मथितार्थ समजेल ह्याची काळजी घेऊ. ह्या कलेत आचरण, विचारांचे प्रकार आणि योग्य कृतीचे महत्व ह्यांचा समावेश आहे. ह्या आपल्या शाळांमधून पृथ्वी, निसर्ग व एकमेकांबद्दलची जबाबदारी हा शिक्षणाचा भाग आहे.

*Letters to Schools*, १५ नोव्हेंबर १९७८

आपल्या जीवनमूल्यांमध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणणारी जाणीव जेव्हा आपल्या मनात निर्माण होईल तेव्हाच एक आगळीवेगळी, नवीन, प्रज्ञावान समाजरचना निर्माण होऊ शकेल. आणि अशी क्रांती तुम्ही आणि मीच घडवून आणू शकू. जोपर्यंत प्रत्येक व्यक्ती आपल्या मानसिक बेड्या तोडून टाकून मुक्त होत नाही तोपर्यंत नवीन व्यवस्था उदयास येऊ शकत नाही.

*Education & the Significance of Life*, प्र. ३

संपादकीय

**कृ**ष्णमूर्तींनी अनेक वेळा, वेगवेगळ्या प्रकारे सामाजिक आपत्तींचे चित्र आपल्यापुढे मांडले आणि हे पण दाखवून दिले की हा समाज आपणच कसा घडवतो आहोत, त्याला आपणच कारणीभूत आहोत, जबाबदार आहोत. तेव्हा हे पण खरे आहे की तो बदलण्याची जबाबदारी आपलीच आहे.

पुढे तर्कशुद्ध पद्धतीने कृष्णमूर्ती दाखवून देतात की देव, देश, धर्म, पैसा, प्रतिष्ठा ही विभाजनाची कारणे आहेत. ही विभाजने हिंसेची कारणे आहेत, एवढेच नव्हे तर ही विभाजने प्रत्यक्ष नसून ती मानवी मनात आहेत, ते विचारांचे खेळ आहेत.

हे प्रत्यक्ष, खरोखर समजणे महत्त्वाचे आहे. तेवढी तीव्र संवेदनशीलता असेल तर ह्या भ्रमाच्या चक्रव्यूहात माणसातील चांगुलपणा हरवत चालला आहे याची कठोर जाणीव होईल व सामाजिक जबाबदारी, सामाजिक बांधिलकी, सामाजिक कर्तव्ये हे विचारांच्या कक्षेत न राहता सहजपणे, विनासायास कृतीत उतरतील. हा बदल व्यक्तीसाठी आंतरिक असेल, कदाचित त्याचे पडसाद समाजात उमटू शकतील.

# समाजाप्रती तुमची जबाबदारी काय आहे?

**जे**व्हा आपण जगाकडे पाहतो तेव्हा प्रत्येकाला हे साधारणपणे स्पष्ट झालं पाहिजे की आपल्यामध्ये मूलभूत परिवर्तनाची आवश्यकता आहे. मी मूलभूत परिवर्तन हे शब्द अशा अर्थी वापरत आहे, वरवरचा नव्हे, अर्धवट सुधारणा नव्हे, ठिगळं लावणं नव्हे किंवा विचाराच्या एखाद्या विशिष्ट साच्यानुसार पूर्वनियोजित जोखीम घेण्याची चिथावणी मिळून केलेली क्रांती नव्हे, परंतु अगदी उच्चतम पातळीवर जेव्हा आपण मनाचे सर्व व्यापार समजून घेण्यास सुरुवात करतो तेव्हा घडून येते ती क्रांती. हा मूलभूत प्रश्न समजून घेतल्याशिवाय मला वाटतं की, कुठच्याही स्तरावरची कुठचीही सुधारणा, मग ती तात्पुरती कितीही फायद्याची असो, तरी ती अखेरीस दु:ख आणि गोंधळाकडेच घेऊन जाणारी असेल.

तेव्हा श्रीमंती आणि गरीबीचा हा अत्यंत गुंतागुंतीचा साचा पाहिल्यानंतर, ही सार्वभौम सरकारे, प्रचंड सैन्य उभारणी आणि मोठ्या प्रमाणावर विनाश करणारी अत्याधुनिक साधने पाहिल्यानंतर आपण स्वत:ला विचारतो की, या सर्व गोंधळामधून काय निष्पन्न होणार आहे आणि हे आपल्याला कुठे घेऊन जाणार आहे. याचं काही उत्तर आहे का? आपण या प्रश्नावर जर खरोखरच गंभीर असू तर मला वाटतं आपण हा प्रश्न स्वत:ला विचारलाच असेल. एक व्यक्ती म्हणून आणि समाज म्हणून आपण ही समस्या कशी हाताळणार? गोंधळलेले असल्यामुळे, आपल्यापैकी बहुतेक जण कुठल्यातरी धार्मिक किंवा सामाजिक साच्याकडे वळतो, या गोंधळातून बाहेर काढण्यासाठी कुठच्यातरी गुरुच्या मार्गदर्शनासाठी जातो किंवा आपण प्राचीन परंपरांकडे जाण्याचा आग्रह धरतो. आपण म्हणतो, 'आपल्या ऋषींनी जे आपल्याला सांगितलं आहे, उपनिषदामध्ये किंवा गीतेमध्ये जे काही सांगितलं आहे त्याकडे परत वळूया.' आपण अधिक प्रार्थना, अधिक धार्मिक विधी, निरनिराळे गुरू, मास्टर्स, यांच्याकडे वळतो. हे आज प्रत्यक्ष घडत आहे, नाही का?

आता हे सगळे गोंधळाचं चित्र पाहिल्यानंतर–तात्विक दृष्टीने नव्हे अथवा आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे केवळ निरीक्षक म्हणून पाहणं नव्हे, परंतु ज्याच्या अंतरंगाला करुणेचा स्पर्श झाला आहे आणि ज्याच्या ह्रदयात सहानुभूतीचं बीज आहे – आणि मला खात्री आहे आपल्यापैकी बहुतेक जणांजवळ ते आहे – अशा अवस्थेतून पाहणं, मग तुम्ही त्या सगळ्याला कसा प्रतिसाद देता? समाजाप्रती तुमची जबाबदारी काय असते? का तुम्ही समाजाच्या चक्रामध्ये केवळ भरडले जात आहात, विशिष्ट संस्कृतीच्या साच्यामध्ये परंपरेचे पालन करीत–मग ते पाश्चिमात्य असो वा पौर्वात्य–आणि म्हणून या संपूर्ण प्रश्नाकडे आपण डोळेझाक करत आहोत का? आणि जर तुम्ही डोळे उघडले तर तुम्ही फक्त सामाजिक सुधारणांविषयीच विचार करणार का, राजकीय कृती, आर्थिक तडजोडींचाच विचार करणार का? या अत्यंत गुंतागुंतीच्या समस्येचं उत्तर तिथे कुठेतरी असेल का? की ते संपूर्णपणे निराळ्याच दिशेने शोधावं लागेल? ही समस्या केवळ सामाजिक अथवा आर्थिक असते का? किंवा तिथे गोंधळ आहे आणि सतत युद्धाची धमकी असते. कारण आपल्यापैकी बहुतेक जणांना जीवनाच्या गहन प्रश्नांविषयी काहीच आस्था नसते, माणसाच्या संपूर्ण विकासाच्या प्रश्नाविषयी कळकळ नसते.

आता, ही वस्तुस्थिती पाहिल्यानंतर – मला खात्री आहे की तुम्हाला त्याचे पूर्ण अवधान आहे – जर तुम्ही असंवेदनशील असाल किंवा ती अवस्था दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत असाल तर ते भान असणार नाही – तुमच्याकडे काय उत्तर आहे? कृपया सैद्धांतिक उत्तर देऊ नका, साम्यवादाच्या तत्त्वाप्रमाणे किंवा भांडवलशाही तत्वानुसार, हिंदु मानसिकतेने किंवा दुसऱ्या कुठच्या तरी तत्वानुसार, जी केवळ एक फसवणूक असते आणि म्हणून सत्य नसते, परंतु मनाला तत्काळ होणाऱ्या प्रतिक्रियेपासून पूर्ण मुक्त करा, तथाकथित बौद्धिक प्रतिक्रियेपासून मुक्त करा आणि शोधून काढा की एक व्यक्ती म्हणून तुमची काय प्रतिक्रिया आहे? ही समस्या तुम्ही कशी सोडवाल?

जर तुम्ही साम्यवादींना हा प्रश्न विचारला, तर त्यांच्याजवळ निश्चित स्वरुपात एक ठराविक उत्तर असतं, तसंच कॅथॉलिक लोकांना विचारल्यानंतर किंवा कर्मठ हिंदूंना किंवा मुसलमानांना विचारल्यानंतर त्यांचं ठराविक उत्तर असतं, परंतु त्यांची उत्तरं ही संस्कारित स्वरूपाची असतात. ते त्याच दृष्टीने प्रशिक्षित, संस्कारित झालेले असतात. संकुचित अथवा विशाल दृष्टिकोनातून, समाजाकडून किंवा त्यांच्या संस्कृतीप्रमाणे ते प्रतिसाद देत असतात. त्याचा मनाच्या संपूर्ण विकासाच्या दृष्टीने काही संबंध नसतो; आणि ते संस्कारित विचारसरणीमधून प्रतिसाद देत असल्यामुळे, त्यांची उत्तरं साहजिकच आंतर्विरोधी असतात आणि म्हणून नेहमीच शत्रुत्त्व निर्माण करीत असतात. जर तुम्ही हिंदू असाल किंवा ख्रिश्चन असाल वा तुम्हाला जे काही म्हणवून घ्यायचं ते असाल, तर तुमचा प्रतिसाद हा तुमच्या संस्कारित पार्श्वभूमीप्रमाणे असणारच, ज्या संस्कारामधून तुम्ही वाढला असाल त्याप्रमाणे असणार. ही समस्या सर्व संस्कृतींच्या पलिकडे, कुठच्याही विशिष्ट साच्यापलिकडे आहे, तरीसुद्धा आपण एका विशिष्ट साच्यानुसार उत्तरं शोधत असतो आणि म्हणून तेथे अधिकाधिक गोंधळ वाढत आहे, अधिक दु:ख – यातना, आणि म्हणून तेथे सर्व संस्कारापासून मूलभूतपणे मुक्त झाल्याशिवाय

आपण साहजिकच अधिक गोंधळ निर्माण करणार, मग आपण कितीही सद्हेतूपूर्वक किंवा तथाकथित धार्मिक संस्काराप्रमाणे वागत असलो तरीही आपण अधिक गोंधळ निर्माण करणार.

मला असं वाटतं की ही समस्या सर्वस्वीपणे एका निराळ्याच स्वरूपाची आहे आणि तिचं आकलन करून घेतल्यानंतर आपल्याकडून अशी एक संपूर्णपणे निराळ्याच प्रकारची कृती घडेल जी समाजवादी, भांडवलशाही किंवा साम्यवादी विचारसरणीपेक्षा वेगळी असेल. माझ्या दृष्टीने मनाची सगळी जडणघडण समजून घेणं हीच समस्या आहे. कारण आपण स्वत:मधील विचारांच्या प्रक्रियांचं निरीक्षण करून ते समजून घेतल्याशिवाय तिथे स्वातंत्र्य-मुक्ती असणार नाही आणि म्हणून आपण फार पुढे जाऊ शकणार नाही. आपल्या बहुतेक जणांचं मन मुक्त नसतं; ते जाणता-अजाणता कुठच्यातरी ज्ञानाशी बांधिल असतं, असंख्य श्रद्धा, अनुभव, ठाम मतांशी निगडित असतं आणि मग तसं मन काहीतरी नवीन, नूतन शोधण्यासाठी कसं समर्थ असू शकेल?

प्रत्येक आव्हानाला तिथे अर्थातच नवीन प्रतिसाद असला पाहिजे. कालच्यापेक्षा आजची समस्या संपूर्णपणे निराळी असते. कुठचीही समस्या ही नवीनच असते. तिच्यामध्ये सतत बदल घडून येत असतो. प्रत्येक आव्हानाची नव्या प्रतिसादाची मागणी असते आणि जर मन मुक्त नसेल तर तिथे नवीन प्रतिसाद असू शकणार नाही. तेव्हा ही मुक्ती सुरुवातीलाच असते, फक्त शेवटी नसते. क्रांतीची सुरुवात सामाजिक, सांस्कृतिक वा आर्थिक स्तरावर होत नसते. ती उच्चतम स्तरावर घडत असते आणि त्या वरच्या स्तराचा शोध हीच समस्या असते - त्या गोष्टीचा शोध, वरचा स्तर असं जे म्हटलं आहे त्याचा केवळ स्वीकार करणं नाही. मी हा मुद्दा स्पष्ट करतो आहे की नाही हे मला माहीत नाही. एखाद्या व्यक्तीला कोणतातरी गुरू, कुठचीतरी हुशार व्यक्ती त्या वरच्या स्तराबद्दल सांगू शकते, आणि तो जे ऐकतो ते पुन:पुन्हा सांगू शकतो. परंतु ती प्रक्रिया म्हणजे शोध नसतो. तो केवळ अधिकाराचा स्वीकार असतो आणि आपण बहुतेकजण अधिकाराचा स्वीकार करतो कारण आपण आळशी असतो. ते सर्व विचारातून मांडलेलं असतं आणि आपण ते ग्रामोफोन रेकॉर्डप्रमाणे फक्त पुन:पुन्हा सांगत असतो.

*Social Responsibility*, मद्रास, ११ जानेवारी १९५६

---

**आ**पल्यापुढील सर्व समस्या खरं तर व्यक्तिगत समस्याच आहेत. कारण व्यक्ती म्हणजेच समाज आहे. व्यक्तीशिवाय समाज नाही, आणि जोपर्यंत व्यक्ती स्वत:ला पूर्ण समजून घेत नाही - आपलं सबोध आणि सुप्त मन समजून घेत नाही, तोपर्यंत त्याने कितीही सुधारणा योजल्या, कुठच्याही देवांचा शोध लावला, कितीही सत्याचा शोध केला तरीही त्याला फारच थोडा अर्थ असेल. तेव्हा वैयक्तिक समस्या ही जगाची समस्या असते, हे अगदी उघड आहे; आणि व्यक्ती जेव्हा स्वत:ला समजून घेऊ शकेल, स्वत:चे मनोव्यापार, सबोध मनाचं कार्य समजून घेऊ शकेल, तेव्हाच जगातील समस्या अंत पावतील. मग जिथे राष्ट्रीयत्त्वं नसतील, श्रद्धा समजुतींच्या सीमा नसतील, राजकीय किंवा धार्मिक ठाम मतप्रणाली नसतील असं एक वेगळं जग निर्माण होण्याची शक्यता आहे.

*The Collected Works, Vol. IX*, सिडनी, ऑस्ट्रेलिया, ९ नोव्हेंबर, १९५५


**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया**, वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. • दूरध्वनी : ०४४०-२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल : info@kfionline.org • वेबसाईट : www.kfionline.org • कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे. • दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारपासून रविवार संध्याकाळपर्यंत निवासी अध्ययन शिबीरे आयोजित केली जातात.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू :** संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कॅंपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी : ०८० - २८४३५२४३ • ईमेल : kfistudy@gmail.com • वेबसाईट : www.kfistudy.org

| | | | |
|---|---|---|---|
| ०७-१० सप्टेंबर २०१७ | Education and the 'Understanding of Life' | २३-२४ सप्टेंबर २०१७ | Education Seminar |
| ०५-०८ ऑक्टोबर २०१७ | Breaking free from the 'Prison of the mind' | ०९-१२ नोव्हेंबर २०१७ | Harmony in Relationship |
| ०६-१० डिसेंबर २०१७ | Retreat for the Young (18 -35 yrs): What are you DOING with your LIFE? | | |
| १८-२१ जानेवारी २०१८ | Significance of "Living in the Here & Now" | | |

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल : kcentrevns@gmail.com • वेबसाईट : www.j-krishnamurti.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री:** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली:** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७३५२
दूरध्वनी : (०८५७१) २६०३७/६८६२२/६८५८२ • ईमेल : study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी:** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९१५१. • ईमेल : krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता - ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल : kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक:** ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल : kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org
२३-२५ डिसेंबर २०१७ Annual Theme Conclave-2017: 'Why we react?'

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर:** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी : (०२२) २६६००२२४, २४२२३१९९ • ई मेल : jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org





# ‘शिक्षक असणे म्हणजे काय?’ : एक कार्यशाळा

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई केंद्र या संस्थेच्या विद्यमाने, बॉम्बे केंब्रिज स्कूलतर्फे आयोजित ७, ८ व ९ जुलै २०१७ या तीन दिवसांदरम्यान अंधेरी येथे माध्यमिक शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विषय होता ‘शिक्षक असणे म्हणजे काय?’ आणि निमित्त होते ते या शाळेच्या रोप्यमहोत्सवी वर्षाचे. मुंबई आणि आसपासच्या उपनगरांमधून जवळ जवळ ११० शिक्षक या कार्यशाळेमध्ये सहभागी झाले होते.

या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी चेन्नईहून ‘द स्कूल’ या कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या शाळेतून शाळेच्या प्राचार्या श्रीम. जयश्री नंबियार तसेच श्रीम. बीना शिवराम व श्री. अरविंद रंगनाथन हे शिक्षक आले होते.

सुरुवातीला आपल्या स्वागतपर भाषणात बॉम्बे केंब्रिज स्कूल या संस्थेचे अध्यक्ष श्री. विक्रम पटेल यांनी या कार्यशाळेचा उद्देश आणि रूपरेषा समजावून सांगितली. या कार्यशाळेचे प्रयोजन सविस्तरपणे सांगताना ते म्हणाले की आज भारतात व इतर देशात असलेल्या कृष्णमूर्तींच्या शाळांचे वैशिष्ट्य काय आहे याचे इतर शाळेतील शिक्षकांना मोठे कुतुहल असते. कृष्णमूर्तींच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनातून चालणाऱ्या या शाळांमधून कशा प्रकारचे शिक्षण दिले जाते, शिक्षक व विद्यार्थी-पालक यांच्यामधील नातेसंबंध कसे असतात व शिकविण्याच्या पद्धती कशा वेगवेगळ्या असतात याचे मार्गदर्शन सर्व शाळांमधील शिक्षकांना व्हावे असा या कार्यशाळेचे आयोजन करण्यामागील प्रधान हेतू आहे. या कार्यशाळेमधून कृष्णमूर्तींच्या शाळांतील शिक्षणपद्धतीविषयी सविस्तर चर्चा, प्रश्नोत्तरे व परिसंवाद घडून यावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रथम श्रीम. जयश्री यांनी या कार्यशाळेची सुरुवात करताना आज आपण आव्हानात्मक परंतु अर्थपूर्ण काळामधून जात आहोत याची आपणा सर्व शिक्षकांना जाणीव आहे असे सांगितले. म्हणून शिक्षकांनी स्वत:कडे तसेच विद्यार्थ्यांच्या परस्परसंबंधांकडे पाहत असताना थोडा अवकाश दिला पाहिजे. आज जगात माहितीतंत्रज्ञानाचा महापूर आला असताना विद्यार्थ्यांना स्वत:कडे पाहण्यासाठी काय करावे लागेल याचे भान आज शिक्षकांना ठेवावे लागेल. कृष्णमूर्ती शाळांचे खरे रहस्य हे आहे की आम्ही मुलांना प्रश्न विचारण्यासाठी सक्षम करीत असतो आणि एकमेकांबरोबर सहकार्याने वागण्यास पूरक अशा वातावरणात त्यांच्याबरोबर संवाद साधत असतो. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील नाते मित्रत्वाचे असते व त्यांना शिक्षकाची भीती वाटणार नाही याची काळजी घेतली जाते. त्यामुळे विद्यार्थी आपले मन शिक्षकाकडे मोकळे करू शकतात. श्री. अरविंद हाच विषय पुढे नेताना म्हणाले की, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामधील समान धागे कुठचे असतात ते शिक्षकांनी शोधून काढले पाहिजेत. त्यांनी विद्यार्थ्यांच्या आजच्या मानसिकतेवर बोलताना सांगितले की, आज यश मिळविण्याच्या मागे विद्यार्थी व पालक सर्व शक्ती पणाला लावीत असतात. त्यापेक्षा विद्यार्थ्याला काय आवडते, त्याचा कल कुठे आहे, त्याची नैसर्गिक ओढ कुठे आहे याचे निरीक्षण करून शिक्षकांनी त्याला मार्गदर्शन केले पाहिजे. ‘एक शिक्षक म्हणून मी कुठच्या बाबी गृहित धरतो आणि त्याचा माझ्या शिक्षक असण्यावर काय परिणाम होतो’, ते मी पाहिले पाहिजे.

श्रीम. बीना यांनी या विषयावर बोलताना सांगितले की शिक्षकांनी हा व्यवसाय मनापासून निवडलेला असला पाहिजे. तरच त्यांना यामध्ये रस घेऊन शिकवताना निरनिराळे प्रयोग करीत शिकविता येईल. विद्यार्थ्यांमध्ये बदल होण्यासाठी प्रयोग करताना स्वत:मध्येसुद्धा बदल करण्यासाठी तयार असले पाहिजे, आपल्या अंतर्मनाशीही संवाद साधला पाहिजे.

श्रीम. जयश्री पुढे असे म्हणाल्या की, आजचे शिक्षण हे विद्यार्थी, शिक्षक, पालक, महाविद्यालये, शाळा, तसेच समाजापुढे फार मोठे आव्हान उभे करत आहे आणि आपण त्याला कसे सामोरे जाणार आहोत हा मोठा प्रश्न आहे. विद्यार्थी केवळ करिअरच्या मागे न लागता तो चांगला माणूस कसा तयार होईल हे पाहणे खूप महत्त्वाचे आहे.

त्यानंतर या विषयावर उपस्थित शिक्षकांबरोबर काही अर्थपूर्ण प्रश्नोत्तरे झाली. सहभागी शिक्षकांनी आपल्या शाळांमधून शिक्षणातील वेगवेगळ्या बाबी कशा हाताळल्या जातात यावर चर्चा केली. त्यानंतर ‘योग्य शिक्षण म्हणजे काय?’ या विषयावरील कृष्णमूर्तींच्या व्याख्यानाचा व्हिडिओ दाखविण्यात आला.

दुसऱ्या दिवसाच्या सुरुवातीला कृष्णमूर्तींची जीवनदृष्टी शिक्षणात कशी अंमलात आणता येईल यासाठी होत असलेल्या प्रयत्नांवर चर्चा करण्यात आली. शिक्षणाच्या विविध अंगांचा खोलवर विचार केला गेला.

शिक्षण आपल्यापुढे वेगवेगळी आव्हाने उभी करते. शाळांमधून सामुदायिक स्तरावर कित्येक वर्षांचा अनुभव असतो. आव्हानांवर तात्काळ तोडगा न काढता, आणि आव्हान ही स्वत:च एक समस्या न बनवता, त्याकडे कसे पाहता येईल? शिक्षकांशी संवाद साधून त्यांना त्यांच्यासमोरील आव्हानांना सृजनात्मक दृष्टिकोनातून सामोरे जाण्यास, आव्हानांचा खोलवर ठाव घेण्यास उद्युक्त केले पाहिजे, असे श्रीम. नंबियार म्हणाल्या. निरीक्षण करणे, संवाद साधणे, मुक्तपणे विचारणा करणे हा शिक्षणाचा गाभा आहे. या महत्त्वाच्या मुद्याकडे त्यांनी शिक्षकांचे लक्ष वेधले.

त्यानंतर काही विशेष माहितीपटांमधील आणि टीव्हीवरील बातम्यांमधील थोडे भाग दाखविण्यात आले. त्यात आपल्या आजूबाजूला चालणारा हिंसाचार, स्त्रियांवरील अत्याचार, स्थलांतरितांच्या समस्या, अतिशय दारिद्र्यात दिवस काढणाऱ्या कामगारांची पिळवणूक, तशाही अवस्थेत परिस्थितीवर मात करत आपल्या मुलांच्या भावी शिक्षणाबद्दलच्या त्यांच्या तीव्र आशा, आकांक्षा अशा विषयांवरील चित्रणे होती. श्री. अरविंद यांनी असे विषय शाळेत हाताळले जावेत का, अशी दृष्ये मुलांना दाखवावीत का, त्यांच्याबरोबर या बाबींवर चर्चा करून त्यांच्यामधील संवेदनशीलता कशी जागृत करता येईल, मुलांच्या प्रतिक्रिया, त्यांचे प्रतिसाद किती उत्स्फूर्त आणि उत्कट असतात इ. वर चर्चा केली.

शिक्षकांनी आपले स्वत:चे मत प्रदर्शित न करता केवळ वास्तव मुद्दे मुलांसमोर ठेवणे, त्याविषयी त्यांच्याबरोबर एकत्रितपणे अधिक माहिती गोळा करणे, एकंदरच प्रतिसादाची गती मंदावणे आणि अधिक खोलवर जाऊन त्या घटनांमागील कारणांचा ठाव घेणे याबद्दल बोलत असताना श्रीम. जयश्री यांनी प्रश्न उभा केला की, एखादी घोर समस्या घडण्याची वाट पाहून मग ती सोडवण्याबद्दल चर्चा करावी का, की एकूणच अशा विषयांबद्दल मुलांच्या जाणीवा सचेतन असाव्यात यासाठी आपण प्रयत्नरत राहावे?

काही लढाईवजा व्हिडिओ गेम्स् आणि प्रत्यक्ष युद्धाची चित्रणे दाखवून व्हिडिओ गेम्सबद्दल चर्चा झाली. अशा काही खेळांमधून मुलांमध्ये धोरणे आखण्याचे कसब विकसित होते असा युक्तिवाद केला जातो. परंतु अशा खेळांमुळे मुलांना हाणामारी, हत्या, विध्वंस, विभाजन अशा विषयांपासून मनोरंजन मिळू लागते आणि मुलांच्या जाणीवा बोथट होऊ लागतात. परिणामत: पुढील आयुष्यात मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग हिंसेला पूरक अशा कृतींमध्ये केला जाण्याची शक्यता असते. मुलांच्या बालमनात अनेक गोष्टींचा उहापोह होत असतो. त्यांच्याशी आपण संवाद साधून ते सारे मनोव्यापार त्यांना दिसू लागल्यास त्यांच्या कल्पनांचे ठाम मतांमध्ये परिवर्तन होणार नाही, ह्याकडे श्रीम. जयश्री यांनी शिक्षकांचे लक्ष वेधले.

शाळेत चालणाऱ्या काही अभ्यासेतर उपक्रमांविषयी चर्चा करताना काही छायाचित्रे दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनी जेव्हा शहरातील झोपडपट्टीवजा वस्तीला भेट दिली तेव्हा त्या घरांमधील स्वच्छता बघून ते आश्चर्यचकित झाले. तसेच तेथील बराच कचरा हा खरे तर उच्चभ्रू समाजाच्या उपयोगात येणाऱ्या वस्तूंच्या वेष्टनांचा होता असे त्यांना दिसून आले.

छोट्या-मोठ्या सहलींमधून बांधकाम चालू असलेल्या ठिकाणच्या कामगारांचे जीवन, ग्रामीण भागांचा, शेती, बागायतींचा अभ्यास, गावकऱ्यांजवळ असेल ते अन्न आलेल्या विद्यार्थ्यांबरोबर वाटून घेण्याची त्यांची प्रवृत्ती असे अनेकविध अनुभव मुलांची जीवनविषयक दृष्टी विस्तृत करतात. सहलीला जाताना रेल्वेच्या साध्या वर्गातील प्रवास, शाळांमधून राहणे, इ. मुळे मुलांना जीवनाचे वेगळे अंग अनुभवण्याची संधी मिळते, जी त्यांच्या सुखवस्तू पालकांबरोबरच्या सफरीत त्यांना मिळत नाही.

या शाळेत अनेक इयत्तांमधील मुलांचे गट एकत्र बसून (Vertical Groups) बऱ्याच विषयांचे वर्ग चालविले जातात. ह्याविषयीची छायाचित्रे दाखविण्यात आली. कार्यशाळेत सहभागी शिक्षकांना याबद्दल अतिशय कुतुहल वाटले आणि यावर सविस्तर चर्चा झाली. श्रीम. बीना यांनी सांगितले की, अशा वर्गांमध्ये सहयोगी शिक्षणाची भावना असते. वरच्या वर्गातील मुलांना लहान मुलांबद्दल जबाबदारीची भावना असते, छोट्या वर्गातील मुले मोठ्या मुलांकडूनही विषय शिकत असतात. इथे शिक्षकाला प्रत्येक मुलाशी संवाद साधणे जरूरीचे असते. काही विषयांची प्रस्तावना एकत्रितपणे करून नंतर ते वेगवेगळ्या गटांसाठी हाताळावे लागतात. ह्या पद्धतीमध्ये मुलांमध्ये स्पर्धा आणि तुलना या भावना पोसल्या जाण्यास वाव नसतो. सतत ठराविक मापनाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन न केले गेल्यामुळे मुलांमध्ये भीतीची भावना असत नाही.

वेगवेगळ्या कला, साहसी उपक्रम, खेळ यामधून मुलांना एकत्र येऊन आव्हाने स्वीकारण्याचे शिक्षण मिळते. या शाळा आंतरशालेय स्पर्धात्मक खेळांमध्ये भाग घेत नसल्याने इतर शाळांमधील मुलांबरोबर संवाद साधण्याच्या उद्देशाने वार्षिक नाट्य महोत्सवाचे आयोजन केले जाते. इतर शाळांमधून या कार्यक्रमात सहभागी होण्याची प्रचंड मागणी असते. विद्यार्थ्यांनी स्वत: अनुभवलेल्या प्रसंगांवर आधारित आणि सामाजिक जाणिवांना चेतना देणारी काही नाटकेही मुले बसवितात.

एकंदरीत सर्व जीवसृष्टीबद्दल आदराची भावना जोपासली जाणे, त्यातील सौंदर्य, नि:स्तब्धता अनुभवणे, आपल्या 'स्व' पलिकडे जाऊन विचार करणे, प्रश्न उभे करणे या साऱ्यातून मिळणाऱ्या शिक्षणाची एक आगळीच गुणवत्ता असते. तेथे तयार उत्तरे नसतात तर सततचा शोध असतो.

दुपारच्या सत्रामध्ये तीन वेगवेगळ्या गटांमधून झालेल्या गट चर्चांमध्ये शिकणे, भीती, राग, परस्परसंबंध, एखाद्या विषयाचा उत्कटतेने अभ्यास करणे, शांतपणे इतरांचे बोलणे ऐकूण घेण्याची कला, इ. विषयांवर विस्तृतपणे विचारांची देवाणघेवाण झाली.

कार्यक्रमाची सांगता करताना 'आपण शिक्षक का आहोत' याबद्दल आत्मनिरीक्षण करण्याने इतर अनेक बाबी क्षुल्लक वाटू लागतात असे. श्रीम. जयश्री नंबियार यांनी सांगितले. शिक्षणाकडे बघण्याचा एक आगळावेगळा दृष्टीकोन आपल्याला गवसला आहे, असे मत सहभागी शिक्षकांनी प्रदर्शित केले. बॉम्बे केंब्रिज गुरूकुल शाळा समुहाच्या विकास प्रमुख श्रीम. सविता यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि या कार्यशाळेतून शिक्षकांना एक वेगळी अंत:प्रेरणा मिळाली असणार अशी आशा प्रकट केली.

९ जुलै रोजी खास बॉम्बे केंब्रिज गुरूकुल समुहांच्या शाळांमधील शिक्षकांसाठी एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षणक्षेत्रात अनेक वर्षे शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा अनुभव असणाऱ्या आणि कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीच्या अभ्यासक श्रीम. वासंती पडते यांनी गोव्यामध्ये एक शाळा स्थापन करताना त्यांनी कशा प्रकारे अनेक महत्त्वाच्या बाबी हाताळल्या त्याबद्दल सविस्तर माहिती दिली. ते येथे त्यांच्या शब्दांत संक्षिप्तपणे मांडले आहे:

'कृष्णमूर्ती शाळांना भेटी दिल्यानंतर व त्या विचारांचे मानवतेसाठी असलेले महत्त्व पटल्यावर सर्वसाधारण शाळांतील मुले ह्याला वंचित राहतात याची तीव्र जाणीव झाली. कृष्णमूर्ती शाळांमधून लक्षात आले की मुलं निर्भय वातावरणात नीट शिकू शकतात, बालपणाच्या निरागसतेत आनंदाने वाढू शकतात.

परिस्थितीतून एक संधी आली आणि आव्हानही. एका इंग्रजी प्रायमरी शाळेतून सल्लागार म्हणून आमंत्रण आले. शाळा म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, पालक, मॅनेजमेंट, शाळेचे इतर कर्मचारी, तसेच अभ्यासक्रम वगैरे. अर्थात इमारत आणि परिसर हे देखील आलेच. या सर्व बाबींना वेगवेगळ्या प्रकारे प्रतिसाद देणे हा या कामाचा भाग होता.

१. मॅनेजमेंटकडून संपूर्ण स्वातंत्र व त्यांचा विश्वास होता. त्यांच्या उद्दिष्टांना पोषक असलेले नियम पाळूनच दिलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग केला गेला.

२. पालक हे एक कठीण आव्हान होते. पण मुलांचे भले व त्यांचे चांगले भवितव्य यावर त्यांचे एकमत होते. 'चांगल्या'च्या बदलत्या व्याख्येवर भर देऊन पालकांकडून या उपक्रमाला पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न होता. मुलांच्या प्रगतीची संपूर्ण जबाबदारी शाळेची राहील या गोष्टीचा त्यांना दिलासा होता. गृहपाठ बंद केला होता. मुलांवरचा ताण कमी करण्याच्या प्रयत्नात पालकांवरचा ताणपण कमी झाला. मुलांच्या भावनिक वाढीत त्यांच्या सहकाराची अपेक्षा असते यावर पालक आणि शिक्षक यांच्याबरोबरील (पीटीए) मिटींगमध्ये चर्चा केल्या जातात.

३. शिक्षकांना जरूरीप्रमाणे प्रशिक्षण दिले जाते. शैक्षणिक विषयांबरोबर सामाजिक, वैज्ञानिक, राजकीय प्रश्नांवर चर्चा, चांगल्या पुस्तकांचे सामुहिक वाचन, इतर वेगळ्या प्रकारे चालणाऱ्या शाळांना भेटी व त्यांचा अभ्यास ह्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्याचा प्रयत्न असतो. भयमुक्त वातावरणात शिकवणे म्हणजे तुलना, परिक्षा, स्पर्धा बंद केल्या जातात. त्यामुळे परिक्षेशिवाय प्रगतीचे मूल्यमापन हा एक मोठा प्रश्न उभा राहतो. असा हा मोठा आवाका असलेला कार्यक्रम अनेक बारकाव्यांसह योजावा लागतो. तो राबवण्यासाठी शिक्षकांची मानसिकता बदलावी लागते. ह्या कार्यक्रमामागचे तत्त्वज्ञान व महत्त्व त्यांना समजणे आवश्यक आहे. ते त्यांना आत्मसात करावे लागते. हा प्रयोग शिक्षकांचा व्हावा लागतो, त्यांच्यावर लादलेला नव्हे. येथे विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांचा वापर नसतो. शिक्षकांना त्यात एक नितांत आनंद मिळेल अशी मानसिकता निर्माण होईल ही जबाबदारी आपली असते.

विद्यार्थ्याने मनात भीती न धरता शिकणे हा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. त्यासाठी प्रामुख्याने तुलना, स्पर्धा संपूर्णपणे टाळल्या जातात. तरीही मुलं शिकली पाहिजेत, प्रगती झाली पाहिजे ही अपेक्षा असते. ही कसरत यशस्वीरित्या पार पाडता येते, असे दिसून येते. उलट अनुभव असा आहे की भय व ताण नसल्यामुळे मुले मुक्त वातावरणात आनंदाने त्यांच्या संपूर्ण क्षमतेप्रमाणे प्रगती करू शकतात. लहान मुलांना महत्त्वाकांक्षा नसते, पालकांना असते. त्यांच्याशी संवाद साधणे व मुलांचे हित जपणे महत्त्वाचे आहे.

अभ्यासक्रमात बरेच बदल करणे भाग असते जेणेकरून शिक्षकांना हा कार्यक्रम सक्षमतेने हाताळता येतो. शाळेच्या इतर कर्मचाऱ्यांना पण ह्या बदलाची जाणीव करून देऊन त्यांच्याशी जवळीक साधली जाते.

शिक्षक, पालक, विद्यार्थी बदलत असतात. ह्या शाळेत गेली वीस-बावीस वर्षे हा प्रयोग चालू आहे. ह्यातून काय निष्पन्न होते याचे मोजमाप नाही, त्याबद्दल अपेक्षा नाही. हा प्रवास आहे, ज्यात उत्कटता आहे, कळकळ आहे आणि हा प्रवास मानवासाठी योग्य दिशेने जात आहे.

श्रीम. वासंती पडतेंशी असा संवाद साधल्याने ही शिक्षणदृष्टी कृष्णमूर्ती शाळांबाहेरही अंमलात आणता येते याबद्दलचा शिक्षकांचा विश्वास अधिकच बळावला. त्यानंतर आधीच्या कार्यशाळेप्रमाणे माहितीपट आणि बातम्यांवरील चित्रणांवर तसेच शाळेतील उपक्रमांवर चर्चा झाली, गटचर्चा झाल्या आणि कृष्णमूर्तींच्या भाषणांचे काही व्हिडिओ दाखविण्यात आला.

बॉम्बे केंब्रिज गुरूकुल समुहात कृष्णमूर्तींच्या शिक्षणदृष्टीच्या अनुषंगाने बरेच उपक्रम केले जात असल्याने तेथील शिक्षकांना ह्या कार्यशाळेमुळे अशा कार्यामागील गहन विचार आणि त्यातील तरल जाणीवा यांचे आकलन झाले असावे, अशी आशा व्यक्त करण्यात आली.


## आंतरराष्ट्रीय रिट्रीटः
## राजघाट कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र

वाराणसी येथे २९ डिसेंबर २०१७ ते ६ जानेवारी २०१८
एका आठवड्याचे आंतरराष्ट्रीय अभ्यास शिबीर.
विषय: 'जीवन जगण्याची कला'. संपर्क:
Email : studycentre@rajghatbesantschool.org
Tel. : +91 5422441289 • Web: www.rajghatbesantschool.org


# तरुणांकरिता जे. कृष्णमूर्ती : नाशिक येथे द्विभाषिक प्रदर्शन

**ना**शिक येथे ७, ८ व ९ जुलै २०१७ या तीन दिवसांमध्ये तेथील कृष्णमूर्ती अभ्यास मंडळाच्या वतीने 'तरुणांकरिता जे. कृष्णमूर्ती' हे द्विभाषिक (इंग्रजी-मराठी) प्रदर्शन श्री. विकास करवीर यांच्या पुढाकाराने आयोजित केले होते. या प्रदर्शनातून कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचे सम्यक दर्शन होण्यासाठी श्री. विक्रम परचुरे यांनी तयार केलेल्या १८ पॅनेल्स् मधील कृष्णमूर्तींची निवडक भाष्ये आणि त्यांना पूरक अशी छायाचित्रे हे या प्रदर्शनाचे विशेष अकर्षण होते. ही पॅनेल्स् आजच्या तरुणांच्या अस्वस्थतेवर व त्यांच्या ताणतणावावर नेमकेपणाने प्रकाश टाकणारी आहेत.

खास तरुणांसाठी आयोजित केलेल्या या प्रदर्शनाला जवळ जवळ २५० युवकांनी तसेच जागरूक नागरिकांनी भेट दिली व विशेषत: मराठी पुस्तकांची विक्रीपण चांगली झाली. नाशिक शहरामध्ये अशा प्रकारचे ग्रंथ प्रदर्शन प्रथमच भरले होते आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

या प्रदर्शनाची फलनिष्पत्ती म्हणजे प्रदर्शनामुळे कुतुहल जागे झालेल्या काही लोकांसाठी २२ जुलै २०१७ रोजी 'परिवर्तनाचे आव्हान' या *Krishnamurti: The Challenge of Change* या माहितीपटाचे मराठी संस्करण दाखवण्यात आले आणि ३० जुलै २०१७ ला प्रदर्शनातील एका पॅनेलच्या विषयसूत्रावर आधारित एक चर्चा बैठक पण आयोजित करण्यात आली आणि आता अशा बैठका मधून मधून घेण्याचे ठरले आहे.

तसेच कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचा परिचय व्हावा या उद्देशाने काही कार्यक्रम आयोजित करण्यासाठी नाशिकमधील काही महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना निमंत्रित करण्यात आले आहे आणि नाशिकजवळील आजूबाजूच्या गावांमधील वाचनालयांमधून कृष्णमूर्तींची पुस्तके भेट देण्याचे ठरविले आहे.

नाशिक येथील संपर्क : ९४२०९१६७३४/९४०४०४६७३४







# तुम्हाला एक मानव म्हणून ह्या प्रचंड जबाबदारीचं अवधान येण्याशिवाय तेथे दुसरा पर्याय नाही

एक व्यक्ती म्हणून या जगामध्ये प्रचंड मोठा बदल घडवून आणण्याची तुमची जबाबदारी आहे. ही तुमची जबाबदारी आहे कारण तुम्ही ह्या समाजाचे एक भाग आहात, कारण तुम्ही मानवाच्या प्रचंड दु:खाचे एक घटक आहात, हा सततचा प्रयत्न, संघर्ष, वेदना आणि चिंता. तुम्ही जबाबदार आहात. तुम्हाला त्या गहन जबाबदारीची जाणीव झाल्याशिवाय आणि त्या जबाबदारीला थेट भिडल्याशिवाय आणि त्या जबाबदारीच्या यंत्रणेचं व संपूर्ण रचनेचं आकलन करून घेतल्याशिवाय, तुम्ही काहीही करा – प्रत्येक मंदिरात जा, हरेक गुरूकडे जा, मास्टर्सकडे जा, जगातील प्रत्येक धार्मिक ग्रंथांचं पारायण करा – परंतु तुमच्या कृतीला काहीही अर्थ असणार नाही. कारण त्या प्रत्यक्ष वस्तुस्थितीपासून फक्त पळवाटा असतात.

म्हणून आपण हे जीवन, हे आपलं अस्तित्व, आपले समाजाशी असलेले नातेसंबंध जाणून घेतले पाहिजेत. आपल्याला प्रत्येक व्यक्तीबरोबरचे तसेच समाजाबरोबरचे नातेसंबंध केवळ समजूनच घ्यायचे नाहीत परंतु त्या नातेसंबंधामध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणायचं आहे आणि ती आपली जबाबदारी आहे. मला वाटत नाही की आपल्याला ती निकड वाटत आहे. आपण राजकारण्यांकडे पाहतो, आपण एखाद्या तत्वज्ञानाकडे पाहतो, आपण अशा काही गूढ आध्यात्मिक शक्तीकडे पाहतो – ती आपल्यामध्ये बदल घडवून आणेल अशी अपेक्षा आपण करतो. तुम्हाला एक मानव म्हणून ह्या प्रचंड जबाबदारीचं अवधान येण्याशिवाय तेथे दुसरा पर्याय नाही आणि त्या जबाबदारीचं अवधान असण्यासाठी तुम्हाला त्याविषयी शिकावं लागेल आणि ते शिकताना तुमचं अगोदरचं सर्व ज्ञान – माहिती बाजूला ठेवावी लागेल – विसरावी लागेल आणि ते शिकण्यासाठी तेथे स्वातंत्र्य पाहिजे, नाहीतर तुम्ही तेच तेच पुन्हा पुन्हा घोकत बसाल. तुम्ही अहिंसा शिकू शकत नाही.

जगामध्ये किती गोंधळ, दु:ख, यातना आहेत हे तुमच्या लक्षात आलं आहे का, हे मला माहीत नाही, आणि तो मनुष्य – आजच्या काळातील मनुष्य – त्यातून बाहेर पडण्यासाठी त्याला मार्ग सापडत नाही म्हणून तो भूतकाळाकडे वळतो. त्याला वाटतं या सर्वांवर तोडगा काढण्यासाठी त्याला पाच ते सात हजार वर्षांपूर्वीच्या भूतकाळामधून पुनरुज्जीवनाचा मार्ग सापडू शकेल आणि पुन्हा त्यामधून त्याला उत्तर मिळत नाही. काळामधून त्याला उत्तर मिळणार नाही. काळामधून तुम्हाला जीवन सुखी करता येईल, अधिक आरामदायी करता येईल परंतु सुख आणि आराम तुम्हाला जीवनातील अंतिम उत्तरं देऊ शकणार नाहीत अथवा काही सुधारणा करूनसुद्धा त्याची उत्तरं सापडणार नाहीत किंवा मंदिरामधून किंवा काही पवित्र ग्रंथामधून त्याचं निरसन होणार नाही. मला वाटतं आपल्याला ह्या साऱ्या गोष्टींचं गांभीर्य समजून घेतलं पाहिजे आणि दुसऱ्या अर्थहीन गोष्टी बाजूला सारल्या पाहिजेत आणि आपण वस्तुस्थितीला सामोरं गेलं पाहिजे – जे आपलं जीवन आहे. आपलं दैनंदिन जीवन – आपलं क्रूर, चिंतातूर, असुरक्षित, कठोर जीवन – त्यामधील सुखं, त्यातील मनोरंजनासह – आणि पाहिलं पाहिजे की एक मानव म्हणून जो आज २० लाख वर्षे जगत आला आहे, तो स्वत:मध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणू शकेल का आणि म्हणून त्या समाजाच्या एकूण रचनेमध्ये बदल घडून येईल का?

या जबाबदारीचं अवधान म्हणजे फार मोठं अवघड, कष्टप्रद काम आहे. आपल्याला केवळ स्वत:मध्येच काम करणं पुरेसं नाही, तर आपल्या नातेसंबंधांमध्ये सुध्दा काम करायचं आहे. मला 'काम' म्हणजे काही मूर्ख सूत्रांचा सराव म्हणायचं नाही, काहीतरी खुळचट सिद्धांत, काही तत्त्वज्ञांचे काल्पनिक युक्तिवाद किंवा गुरू–बाबांची ठाम मतं अभिप्रेत नाहीत. ते सर्व अगदी बालिश, अपरिपक्व असतात. जेव्हा आपण कामासंबंधी बोलतो, तेव्हा आपण आपल्या जबाबदारीच्या जाणीवेसंबंधी बोलत असतो, या जगात जगणारा एक माणूस म्हणून. कारण त्याला स्वत:मध्येच बदल घडवून आणण्यासाठीच काम करायचं असतं आणि त्याच्यामध्ये खरोखरच जर परिवर्तन घडून आलं, जर त्याच्यामध्ये आमूलाग्र क्रांति झाली, तर तो समाजाला बदलू शकेल. कोणत्याही क्रांतीमधून समाज बदलणार नाही, मग ती आर्थिक वा सामाजिक क्रांती असो. आपण फ्रेंच क्रांतीमधून हे पाहिलेलं आहे. रशियन क्रांतीसुद्धा पाहिली आहे. माणसाची जी चिरंतन आशा आहे की बाहेरील जग बदलल्यानंतर माणसाच्या अंतरंगातील स्वरूपाचं परिवर्तन होईल – ही आशा कधीच पूर्ण झालेली नाही आणि ती कधीही पूर्ण होणार नाही. बाहेरील बदल, आर्थिक क्रांती जी या अतिशय गरीबी असलेल्या देशामध्ये कधीतरी येणारच आहे – ती क्रांती माणसाचा स्वभाव, दृष्टिकोन बदलू शकणार नाही, माणसाच्या जीवन जगण्याची चाकोरी, त्याचं दु:ख आणि त्याचा गोंधळ कधीच घालवू शकणार नाही.

म्हणून माणसामध्ये संपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी त्याला स्वत:चंच अवधान आलं पाहिजे – म्हणजेच त्याला स्वत:संबंधीच नव्याने शिकलं पाहिजे. मानववंशशास्त्राच्या आधुनिक संशोधनाप्रमाणे माणूस या जगात वीस लाख वर्षे जगत आला आहे आणि त्याला या दु:खापासून मुक्त होण्याचा मार्ग अजून सापडलेला नाही. त्याने त्यापासून पळ काढला आहे, काहीतरी काल्पनिक भ्रमामधून त्यातून त्याने पळवाटा शोधून काढल्या आहेत. परंतु त्याला संपूर्ण मुक्त असा समाज निर्माण करता आला नाही. त्याला अजून तसा मार्ग सापडलेला नाही, कशाशीही जुळवून घेणार नाही असा समाज त्याला निर्माण करता आला नाही.

*Social Responsibility*, मुंबई, १०, फेब्रुवारी १९६५

## वार्षिक संमेलन २०१७

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया या संस्थेचे वार्षिक संमेलन या वर्षी सह्याद्री अध्ययन केंद्र येथे ११ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०१७ या दिवसांमध्ये आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाचा विषय आहे, *The Common Ground of Humanity* (मानवतेचे समान धागे) सर्वांसाठी खुल्या असलेल्या या संमेलनामध्ये कृष्णमूर्तींची व्हिडिओ भाषणे तसेच गटचर्चा व इतर उपक्रमांमधून कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीच्या आधारे आपल्या जीवनाचा शोध घ्यायचा आहे. ज्यांना या संमेलनामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी अधिक माहितीसाठी खाली संपर्क साधावा.

Email : kfisahyadrischool@gmail.com
Tel.: (02135) 306192 / 288442 / 288443

# ...आणि तुमच्यामध्ये परिवर्तन झाल्याशिवाय जगामध्ये परिवर्तन होणं शक्य नाही

तेव्हा पहिल्या प्रथम ही गोष्ट समजली पाहिजे की जगाची समस्या ही व्यक्तीगत समस्या असते. ती तुमची समस्या असते आणि माझी समस्या असते आणि जगाची प्रक्रिया ही व्यक्तिगत प्रक्रियेहून निराळी नसते. ती संयुक्त घटना असते आणि म्हणून तुम्ही जे काही करता, तुम्ही जो विचार करता, तुम्हाला जसं वाटतं, ते एखादा कायदा करण्यापेक्षा किंवा एखाद्या पक्षाला बांधिल असण्यापेक्षा वा संघटित लोकांबरोबर असण्यापेक्षा खूप महत्त्वाचं असतं. हे पहिलं सत्य आपण समजून घेतलं पाहिजे – जे अगदी स्पष्ट आहे. जगामध्ये क्रांती घडून येणं आवश्यक आहे. परंतु एखाद्या साच्याला अनुसरून झालेली क्रांती ही क्रांती नसते. क्रांती त्याच वेळी घडू शकते जेव्हा तुम्ही एक व्यक्ती म्हणून स्वत:ला समजून घेता आणि म्हणून नवीन कृतीची प्रक्रिया निर्माण करता. निश्चितच आपल्याला क्रांतीची जरूरी आहे. कारण प्रत्येक गोष्ट बिघडत चाललेली आहे – सामाजिक रचनाबंध ढासळत आहेत. युद्धामागून युद्धं होत आहेत. आपण डोंगराच्या कड्यावर उभे आहोत आणि म्हणून कोणत्या तरी परिवर्तनाची अत्यंत आवश्यकता आहे. कारण जसे आपण जगत आहोत तसे फार काळ जगू शकणार नाही. डावे एक प्रकारची क्रांती करण्याचे प्रयत्न करीत आहेत आणि उजवे डाव्यांच्या क्रांतीला दुसरा पर्याय – सुधारणा सुचवीत आहेत. परंतु अशा क्रांत्या ह्या क्रांत्या नसतात. त्या समस्या सोडवत नाहीत. कारण माणूस इतका गुंतागुंतीचा बनलेला आहे की केवळ एखाद्या सूत्रामधून, एका विशिष्ट आकृतिबंधातून त्याला समजून घेणं फार कठीण आहे आणि सततच्या क्रांतीची आवश्यकता असल्यामुळे ती फक्त तुमच्यापासूनच सुरू होऊ शकते. तुमच्या स्वत:ला समजून घेण्यातूनच सुरू होऊ शकते ती वस्तुस्थिती आहे, तेच सत्य आहे आणि तुम्ही कुठच्याही दृष्टीने त्याच्याकडे पाहिलंत तरी तुम्हाला ते टाळता येणार नाही आणि त्यातील सत्य पाहिल्यानंतर तुम्ही तुमच्या स्वत:च्या समग्र प्रक्रियेचा शोध घेण्याचा निश्चय केला पाहिजे कारण तुम्ही जे काही आहात तसेच जग आहे. जर तुमचे मन नोकरशहाचं असेल, तर तुम्ही नोकरशाही निर्माण कराल. जर तुम्ही लोभी, मत्सरी, संकुचित, राष्ट्रवादी असाल तर तुम्ही असं जग निर्माण कराल की जेथे राष्ट्रवादाला खतपाणी मिळेल – जे माणसांनाच नष्ट करतं. लोभ, विभाजन, इस्टेट यावर आधारलेली सामाजिक रचना माणसांनाच नष्ट करते. म्हणून तुम्ही जसे आहात तसं जग आहे आणि म्हणून तुमच्यामध्ये परिवर्तन झाल्याशिवाय जगामध्ये परिवर्तन होणार नाही. परंतु स्वत:चा शोध घेण्यासाठी अतिशय काळजी घ्यावी लागते, असामान्य अशी तरल लवचिकता लागते आणि ज्या मनाला फळाची, निष्कर्षाची आस असते ते विचारांची चपळ हालचाल कधीच पकडू शकणार नाही. तेव्हा मग व्यक्तीच जबाबदार असते, तुम्हीच या संपूर्ण गोंधळाला जबाबदार आहात हे सत्य पाहणं हीच मोठी अडचण असते आणि जेव्हा तुम्ही ही जबाबदारी पाहता तेव्हा आपल्या मनाच्या दृढ निश्चयाने निरीक्षण करणं आणि त्यातून तुमच्यामध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणणं हे देखील कठीण असतं.

*Social Responsibility,* बंगळुरू,
११ जुलै १९४८

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड,
चेन्नई – ६०० ०२८.
दूरध्वनी : ०४४ २४९३ ७८०३/७५९६
ई-मेल : info@kfionline.org
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र:**

हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.
संपर्क :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
मुंबई एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४००००६.
दूरध्वनी – ०२२ २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*

**Krishnamurti Foundation India**
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : indiaprintingworks@gmail.com ● Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs. E-mail : info@Eurythmicdesigns.com*